# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्रं. 102/2024 दिनांक : 18.03.2024**

## 1)घरफोडी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 15.03.2024 रोजी चे 22.00 ते दिनांक 16.03.2024 चे सकाळी 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी जवाहरनगर नांदेड येथे,** यातील अज्ञात चोरटयांनी फिर्यादीचे घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील कपाटाचे लॉक तोडुन आतील सोन्याचे दागीने व नगदी 30,000/–रू असा एकुण 70,000/–रू चा मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुरेश चंद्रकांत किनीकर, वय 50 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. जवाहरनगर. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 82/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री साने, मो. नं. 7249047323** हे करीत आहेत.

**2)तामसा :–** दिनांक 16.03.2024 रोजी चे 22.00 ते दिनांक 17.03.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **वारकवाडी फिर्यादीचे घरी ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे कुटूंबासह शेतात हळद पीक शिजविण्यासाठी गेले असता घरी कोणी नसल्याचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कुलूप तोडुन कपाटातील कपडे अस्ताव्यस्त टाकुन लोखंडी पेटीतील कुलूप काढुन स्टीलच्या डब्यातील ठेवलेले नगदी 1,50,000/–रू व सात ग्रॅम सोन्याचे कानातील फुले किंमती 35,000/–रू असा एकुण 1,85,000/–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी देवराव फुलसिंग चोबे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. वारकवाडी ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 27/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवटे, मो. नं. 8149863325** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 12.03.2017 पासुन ते दिनांक 11.03.2024 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी जयराम तांडा ता. कंधार जि. नांदेड येथे** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहीस तुझे वडीलांकडुन घरबांधकामासाठी पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 33 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 199/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंगे, मो.क्रं. 9923480486** हे करीत आहेत.

## 3)अपघात :–

**1)विमानतळ :–** दि. 15.03.2024 रोजी चे सकाळी 06.00 वा. चे सुमारास, **आसना ब्रिज ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1)दाजीबा शंकरराव गाढे, वय 65 वर्षे, 2)गोपीनाथ दाजीबा गाढे, वय 40 वर्षे, दोघे रा. भोगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** हे दोघेही मोटार सायकल क्रमांक एमएच–22/एजी–7822 यावर बसुन मौ. भोगाव ते नांदेड जात असतांना यातील आयचर वाहन क्रमांक एमएच–45/एई–8811 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मोटार सायकलला जोराची धडक देवुन गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभुत झाला. आयचर जागेवर सोडुन पळुन गेला. वगैरे **फिर्यादी नवनाथ दाजीबराव गाढे, वय 36 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. भोगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 81/2024 कलम 279, 304(अ) भादवी सह कलम 184 मोवाका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्रीमती माया भोसले, मो.क्र. 8390613489** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दि. 16.03.2024 रोजी चे रात्री 10.30 वा. चे सुमारास, **महाराष्ट्र शाकाहारी हॉटेल वाजेगाव समोर मेन रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शेख एजाज शेख गौस, वय 22 वर्षे, रा. वाजेगाव ता. जि. नांदेड** यास यातील आरोपीने उसाचे दोन ट्रॉली असलेले ट्रॅक्टर क्रमांक एमएच–26/बीएक्स–6533 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणे अविचाराने चालवुन समोरून जोराची धडक देवुन अंगावर टायर घालुन गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी शेख शादुल शेख गौस, वय 20 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. वाजेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 197/2024 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्र. 9823031227** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :—

**किनवट :—**दिनांक 15.03.2024 रोजी चे 21.00 ते दिनांक 16.03.2024 चे सकाळी 07.00 वा. चे दरम्यान, **एन के गार्डनच्या पुढे किनवट ते गोकुंदा रोडच्या बाजुला किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा भाऊ किनवट ते दत्तनगर गोकुंदा येथे पायी जात असतांना राष्ट्रीय महामार्गाच्या लगत ब्रिज जवळील नाल्याजवळ यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून घरबांधकामाचे कारणावरून कोणत्यातरी अज्ञात शस्त्राने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली. तसेच मानेला, गळयावर, पायावर किरकोळ मारहाण केली. वगैरे **फिर्यादी किरण नारायणराव ठाकरे, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कुंभार गल्ली किनवट नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 66/2024 कलम 326, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/गोटके, मो. नं. 7798597775** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :—

**सोनखेड :—** दिनांक 17.03.2024 रोजी चे 21.00 ते 21.30 वा. चे दरम्यान, **सोनखेड बसस्थानक ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे ताब्यातील बस क्रमांक एमएच—09/एफएल—1059 ही नांदेड ते पुणे जात असतांना सोनखेड बसस्थानक येथे बस आली असता प्रवासी नसल्याने बस थोडी पुढे गेली असता बसच्या पाठीमागुन यातील नमुद चार ते पाच आरोपीतांनी गैरकादयाची मंडळी जमवुन बस समोर मोटार सायकल आडवी लावुन यातील फिर्यादीस व इतर प्रवाशास शिवीगाळ व मारहाण केली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी बालाजी पांडुरंग वडजे, वय 45 वर्षे, व्यवसाय बस वाहक रा. ईकळीमोर ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 44/2024 कलम 353,323,504,506, 143, 149 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2342 हंबर्डे, मो.क्रं. 8208374495** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :—

**1)देगलुर :—** दिनांक 17.03.2024 रोजी 16.20 वा. सुमारास, **मौ. तडखेल रोडवर क्रेशर मशिन जवळ ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने दाखले व वैद्यकीय प्रमाण पत्राशिवाय अवैध पणे कत्तल करण्यासाठी गोवंश जातीचे 03 कालवडी किंमती 32,000/—रू चे घेवुन जात असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2195 गणपत देवला राठोड, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 117/2024 कलम 5(अ)(1),9 महाराष्ट्र प्राणीसंरक्षण अधिनियम 1976 प्रमाणे सुधारणा अधिनयम 2015 अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2462 केंद्रे, मो.क्रं. 8767312795** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 16.03.2024 रोजी चे 15.40 वा. चे सुमारास, **मौ. हस्सापुर रोडवर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या दाखले व वैद्यकीय प्रमाण पत्राशिवाय अवैध पणे कत्तल करण्यासाठी दाटीवाटी कोंडुन तीन आयचर वाहन किंमती 8,80,000/—रू व 48 म्हैशी किंमती 6,34,000/—रूपये असे एकुण 15,14,000/—रू मध्ये म्हशींची निर्दयीपणे वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2641 माधव बंडाप्पा स्वामी, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 198/2024 कलम 11(ड)(ई), महाराष्ट्र प्राणीसंरक्षण अधिनियम 1960 सह कलम 125 मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मटवाड, मो.क्रं. 9922778115** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**1)मुदखेड :—** दिनांक 17.03.2024 रोजी चे 16.45 वा. सुमारास, **आरोपीचे घराचे ओसरीत मौ. कामळज ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी महिला हिने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटटीची गावठी दारू किंमती 4,000/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेली मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/महेंद्रकुमार केरबाराव कवठेकर, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 43/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2187 आलेवार, मो.नं. 9158756087** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :—** दिनांक 17.03.2024 रोजी चे 19.40 वा. सुमारास, **उमरचौक हिमातयनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू किंमती 3360/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1272 श्यामसुदंर गंगाधर नागरगोजे, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 53/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **मसपोउपनि/कागणे, मो.नं. 8888807957** हे करीत आहेत.

**3)मुक्रामाबाद :—** दिनांक 17.03.2024 रोजी चे 15.00 वा. सुमारास, **संभाजी शिंदे यांचे दुकानासमोर मौ. कलंबर ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हाभटटीची गावठी दारू किंमती 4800/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/346 गजानन मारोती ढगे, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 46/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2068 कागणे, मो.नं. 8421437070** हे करीत आहेत.

**4)लोहा :—** दिनांक 17.03.2024 रोजी चे 20.15 वा. सुमारास, **बुलढाणा अर्बन बँकेसमोर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 7200/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/मंगेश नरसिंगराव नाईक, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 75/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2107 खाडे, मो.नं. 9823703017** हे करीत आहेत.

## 8)विज पडुन मृत्यु :—

**कंधार :—**दिनांक 16.03.2024 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **मयताचे शेतात मौ. येलुर शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे बालाजी व्यंकटराव शिंदे, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. येलुर ता. कंधार जि. नांदेड,** हे शेतातुन घराकडे येत असतांना त्यांचे अंगावर विज पडल्याने बेहोश झाले असता त्यांना उपचार कामी सरकारी दवाखाना मुखेड येथे शरीक केले असता तेथील डॉक्टरांनी मयत घोषीत केले. वगैरे **खबर देणार श्रीराम नानाराव शिंदे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. येलुर ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. 15/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गीते, मो.नं. 8007807771** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड